# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. १६ /२०१६**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीबाबत मा. राज्य माहिती आयोगापुढील द्वितीय अपीलाच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५) सहा, अन्वये दिनांक ०१/१२/२०१५ रोजी परिपत्रक निर्गमित केले असून सदर परिपत्रकात नमूद केलेल्या सूचनांचे पालन करण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.७८३/विशी-३, दिनांक ११/१२/२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सदरचे परिपत्रक माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव यासोबत जोडण्यात आले आहे.

**(डॉ. नरेंद्र मा. कडू)**
**कुलसचिव**

**गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.**
**जा.क्र. - मा.अ./२०१६/२२६**
**दिनांक -२५/०१/२०१६.**

**<u>सोबत :-</u>** वरीलप्रमाणे शासन परिपत्रक.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-**

१) सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७.
२) सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय शाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७.
३) सर्व प्राचार्य/संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

21/12/2015
4.00 pm

अतितात्काळ

महाराष्ट्र शासन

माहिती अधिकारी कार्यालय
आवक क्रमांक - मा. अ./ 2015/3300
दिनांक २१/१२/२०१५.

क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र.७८३ /विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
ई-मेल:- htdvishi४३@gmail.com
दि. ११/१२/२०१५

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक /क्र.आर/ 5092
दिनांक - 18/12/2015
जावक दिनांक - 18/12/15
विभाग - PJD

प्रति,
१) कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.
२) संचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
पुणे.

**विषय-** माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीबाबत द्वितीय सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत.

**संदर्भ-** सामान्य प्रशासन विभागाचे क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५) /सहा, दि. १/१२/२०१५ रोजीचे शासन माहिती अधिकारांतर्गत शासन परिपत्रक.

महोदय,

संदर्भाधीन सामान्य प्रशासन विभागाचे क्र. संकीर्ण- २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि. १/१२/२०१५ रोजीचे शासन माहिती अधिकारांतर्गत शासन परिपत्रक यासोबत जोडण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रकात नमूद केलेल्या सूचनांचे पालन करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात यावे, ही विनंती.

आपली विश्वासू,
(स्नेहा न. जोशी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

का.स.

जनमाहिती अधिकारी
18.12.15

५१२१७५.

**महाराष्ट्र शासन**

**अतितात्काळ**

क्रमांक: संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२२५/१५/आस्था-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
रु.नं.४३१(विस्तार), ४ था माळा, मंत्रालय, मुंबई-३२.
E-mail-htedest@gmail.com
दूरध्वनी क्रमांक ०२२-२२८५५७६६
दिनांक: २ डिसेंबर, २०१५.

प्रति,

१) **उप सचिव,**
**(महाविद्यालयीन शिक्षण/विद्यापीठ शिक्षण/कला/तंत्र शिक्षण/ग्रंथालये),**
२) **कक्ष अधिकारी(आस्था-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.**
३) **संचालक,**
**(तंत्र शिक्षण/उच्च शिक्षण/कला/ग्रंथालय) संचालनालय, महाराष्ट्र राज्य.**

**विषय:** माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीबाबत द्वितीय अपील सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत.

**संदर्भ:-** सामान्य प्रशासन विभागाचे क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि. १.१२.२०१५ रोजीचे शासन माहिती अधिकारांतर्गत शासन परिपत्रक.

संदर्भाधीन सामान्य प्रशासन विभागाचे क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि. १.१२.२०१५ रोजीचे शासन माहिती अधिकारांतर्गत शासन परिपत्रक यासोबत जोडण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रकात नमूद केलेल्या सूचनांचे पालन करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात यावे, ही विनंती.

**( शीतल रा. कदम )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

Renuka-Letters

माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अंमल बजावणीबाबत व्दितीय अपील सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५ /प्र.क्र.(२२२ /१५) सहा.
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- ०१.१२.२०१५.

पहा- मा.राज्य माहिती आयुक्त, नागपूर यांचे दि. १२.५.२०१५ चे आदेश.

परिपत्रकः-

माहिती अधिकारातील काही प्रकरणात अर्जदारांच्या माहिती अर्जास प्रतिसाद दिला जात नाही, अशा प्रकरणी झालेल्या प्रथम अपीलाकडे, माहिती उपलब्ध करून देण्यानुषंगाने तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ ची अंमलबजावणी करण्यानुषंगाने सकारात्मक कार्यवाही न करता, माहिती उपलब्ध करून देण्यानुषंगाने हेतुपुरस्सर टाळाटाळ केली जाते, प्रथम अपीलीय अधिकारी, तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच इतर संबंधीत अधिकारी आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता अपीलाच्या सुनावणीस गैरहजर राहतात असे शेरे श्रीमती दुर्गा जोहरी यांनी केलेल्या व्दितीय अपील क्र.२९४२/२०१४ मध्ये दि.१२.५.२०१५ रोजी निर्णय देताना मा.राज्य माहिती आयुक्त, नागपूर यांनी निर्णयात नमूद केले असून त्याकडे मा.मुख्य सचिव महोदयांचे लक्ष वेधले आहे. त्यावर आवश्यक सूचना निर्गमित करण्याचे मा.मुख्य सचिव महोदयांनी आदेशित केले आहे. या अनुषंगाने सर्व विभागांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे सूचित करीत आहे.

२. उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता, शासन असे आदेश देत आहे की, माहिती अधिकार प्रकरणात अर्जदारांना माहिती उपलब्ध करून देण्यानुषंगाने सकारात्मक कार्यवाही करण्यात यावी. माहिती उपलब्ध करून देण्यानुषंगाने संबंधीत जन माहिती अधिकाऱ्याने तसेच प्रथम अपीलीय अधिकाऱ्याने माहिती उपलब्ध करून देण्यात हेतुपुरस्सरपणे टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल. व्दितीय अपील सुनावणीत तत्कालीन जन माहिती अधिकारी, आयोगाने आदेशित केले असल्यास प्रथम अपीलीय प्राधिकारी तसेच इतर संबंधीत

अधिकारी आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता व्दितीय अपीलाच्या सुनावणीस गैरहजर राहील्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

३. उपरोक्त बाब सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनीक प्राधिकरण तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसर आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२०११२२१०८२८०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Rajendra M Jadhav

Digitally signed by Rajendra M Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GENERAL ADMINISTRATION DEPT., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=656ebca17998fd5c29178a5abcf1aa60d72bd5515ddc791d9ad9786418f07e4f, cn=Rajendra M Jadhav
Date: 2015.12.01 12:21:49 +05'30'

(रा.मा.जाधव)
**शासनाचे उप सचिव.**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव.
३) सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
५) सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
६) *प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
७) *प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
८) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
९) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०) प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
११) मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
१२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई

१३) सर्व मंत्रालयीन विभाग (प्रशासकीय अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह )
१४) सर्व विभागीय आयुक्त
१५) महासंचालक, यशदा, पुणे
१६) सर्व जिल्हाधिकारी
१७) निवडनस्ती, सा.प्र.वि. कार्यासन सहा.

***पत्राने**